# वाघाच्या शिकार प्रकरणी चार संशयीत पकडले

## ●चार वाघ नखे जप्त ●संशयीत आरोपींची उलट तपासणी सुरु

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.30 )-** मेळघाट प्रादेशिक वनविभाग, परतवाडा अंतर्गत अंजनगाव वन परिक्षेत्रातील पांढरा खडक वर्तुळातील त्या टी 88 वाघाची शिकार झाल्याची घटना 26 नोव्हेंबर रोजी समोर आली होती. याप्रकरणी तपास पथकाने चार संशयीतांना पकडले असून त्यांच्याकडून चार वाघ नखे जप्त केली आहे.




26 नोव्हेंबर रोजी अंजनगाव सुर्जी वनपरिक्षेत्रातील वनखंड क्र.1032 वस्तापूर नियतक्षेत्र, पांढराखडक वर्तुळ येथे गस्तीवर असलेल्या वन कर्मचाऱ्यांना नर जातीचा एक वाघ मृतावस्थेत आढळून आला होता. घटनास्थळाचे 01 कि.मी. परीघामध्ये बारकाईने पाहणी करण्यात येत आहे. घटनास्थळी मृत वन्यप्राणी वाघाचे तीन पंजे नसल्याचे आढळून आले व नखे नसलेला एक पंजा व दोन नखे आढळून आले. मेळघाट व्याघ्र प्रकल्प अंतर्गत क्राईम सेल यांनी त्यांचे डाटाबेसनुसार सदरील वाघ हा ञ्च 88 असल्याचे समजले होते. 27 नोव्हेंबर रोजी सकाळी एनटीसीए चे मार्गदर्शक सूचना नुसार शवविच्छेदन पथक गठीत करून वाघावर अंत्यसंस्कार करण्यात आले होते. त्यानंतर वनविभाग व पोलीस पथकाने यामध्ये तपास आरंभिला होता.

### बल्लाखेडा येथून पकडले आरोपी

या शिकार प्रकरणातील आरोपीचा शोध घेण्याकरिता चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. या चौकशी समिती अंतर्गत क्राईम सेल व पोलीस विभाग यांचेसोबत समन्वय साधून अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातंर्गत बल्लाखेडा येथून 4 संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून 4 वाघ नखंही जप्त करण्यात आली. यामधील इतर नख आणि आरोपींचा शोध घेणे सुरु असल्याचे मेळघाट प्रादेशिक वनविभागाचे उपवनसंरक्षक अग्रीम सैनी यांनी कळविले आहे.

# महामार्गावरील अपघातांची मालिका थांबेना!

## ■राष्ट्रीय महामार्ग व वनविभागाच्या वाद उठला जीवावर

## ■पुसला वळण रस्त्यांवर एकाच दिवशी दोन अपघात!

### एकाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.30 )-** तालुक्यातील पुसला रेल्वे क्रॉसिंग जवळील असलेल्या अमरावती ते पांढुर्णा माहामार्गावर शुक्रवार दि.29 ला पहाटे 4.30 वाजता सीताफळाचे कॅरेट घेऊन इलाहाबादकडे जाणाऱ्या बोलेरो पिकअप वाहनाचा वण्यप्राणी आडवा आल्याने अपघात झाला तर दुपारी 2.30 वाजताच्या सुमारास बोलेरो पिकअप ट्रॅक्टर ट्रालीवर आदळल्याने दुसरा अपघात झाला या अपघातात 25 वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला. विशेष म्हणजे या ठिकाणी नेहमीच अपघात होतात.

प्राप्त माहितीनुसार, वरूड वरून पांढुर्णाकडे जात असलेले बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एमएच 47 / टीसी 117 सिताफळ व अंगुर घेऊन भरधाव वेगाने जात असताना पुढे कच्चा व अरूंद रस्ता असल्याचे पिकअप चालकाच्या लक्षात न आल्याने पुसल्याकडुन वरूडकडे विटा घेऊन येत असलेल्या एमएच 27/ एलयु 2706 क्रमांकाच्या ट्रॅक्टर चालकाने आपला ट्रॅक्टरचा मुंडा कॉंक्रिटीकरण झालेल्या रस्त्यावर काढताच भरधाव वेगाने येणाऱ्या पिकअप वाहनाला या ट्रालीला जोरदार धडक लागली. या भीषण अपघातात बोलेरो पिकअपचा चुराडा झाला, तर चालकाचा घटनास्थळीच दुर्दैवी मृत्यू झाला. मोहम्मद अशरफ मोहम्मद जफरूल्ला खान (25 रा.विजयापुर जि.मिर्झापुर, उ.प्र) असे मृतक बोलेरो पिकअप चालकाचे नाव आहे. ही धडक इतकी जबर होती की, धडकेत ट्रालीचा मागच्या बाजुचा टायर सुद्धा फुटला. घटनेची माहिती शे.घाट पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठले व जखमीला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पोलिसांनी मृतकाच्या कुटुंबीयांशी संपर्क साधुन घटनेची माहिती दिली. शवविच्छेदनानंतर युवकाचे शव कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात आले. घटनेचा पंचनामा ठाणेदार महाडीक यांच्या मार्गदर्शनात संदिप वानखडे, विष्णू पवार, अक्षय खराटे यांनी करून अपघातातील गुन्ह्याची नोंद केली आहे.



### 12 डिसेंबरला सुटणार का रस्त्याचा प्रश्न?

या रस्त्यावर वारंवार होणारे अपघात लक्षात घेता आचारसंहिता सुरू असताना पुसला ग्रामवासीयांनी पाच तास रस्ता अडवुन चक्काजाम आंदोलन केले होते. या आंदोलनाने संपूर्ण प्रशासणाचे लक्ष वेधले होते. तहसीलदार व वनविभागाचे अधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी जाऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली होती व यावर लवकरच तोडगा काढण्यासाठी बैठक बोलावू असे आश्वासित करण्यात आले होते. त्यामुळे दिलेल्या तारखेचे पालन करून या अपघातग्रस्त रस्त्यावर लवकरच तोडगा निघणार का हे 12 डिसेंबरच्या बैठकीनंतरच कळेल.

### बोलेरो वाहन पलटले

याच मार्गावर पहाटे 4.30 वाजता बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम एच 38 एक्स 1882 इलाहाबाद सिताफळाचे कॅरेट घेऊन जात असताना अचानक वण्यप्राणी आडवा आल्याने त्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात वाहन चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले व वाहन पलटी झाले. या अपघातात पिकअप मधील सिताफळाचे कॅरेट रस्त्यावर पसरले. या वाहन चालकाला किरकोळ जखमा झाल्या असुन यावेळी मोठा अनर्थ टळला.

# महिलेचा केला विनयभंग

**अमरावती** – परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संतोष नगर येथील फिर्यादी 38 वर्षीय महिला एका घरात स्वयंपाकाचे काम करत होती. यावेळी आरोपी नितेश किल्लेदार याने महिलेला वारंवार फोन करून चुकीच्या उद्देशाने तिच्याशी बोलला. विनयभंग केल्याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी नितेश किल्लेदारविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# बिथरलेल्या मधमाशांच्या पोळाचा हल्ला

## अंत्यविधीदरम्यान स्मशानातील 35 ते 40 नागरीकांना दंश

**महासागर प्रतिनिधी**

**वलगाव,( दि.30 )** – नजिकच्या टाकरखेडा संभू येथील स्मशानभुमीत अंत्यविधी सुरू असतानाच अचानक मधमाशांनी हल्ला केल्याने नागरीकांची धावपळ सुरू झाली आणि जागा मिळेल तिकडे नागरिक सैरावैरा पळू लागले. दरम्यान मधमाश्यांच्या हल्ल्यात 35 ते 40 नागरीक जखमी झाले आहेत. ही घटना शनिवारी दुपारी 2.30 वाजताच्या सुमारास घडली. यातील काहींवर वलगाव आणि अमरावतीमध्ये उपचार सुरू आहे.



गावातील मोहन लक्ष्मण टवलारे 55 यांचे शनिवारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यामुळे दुपारी त्यांच्या अत्यंविधीला गावातील तसेच बाहेरगावातील नागरीक हजर झाले होते. येथील अंबराई येथील स्मशानभुमित त्यांच्यावर अंत्यसंस्कार सुरू असतानाच अचानक मधमाशांनी हल्ला चढविला. त्यामुळे अंत्यंविधी मध्येच सोडून नारीकांनी पळ काढला. अचानक केलेल्या या हल्ल्यामुळे नागरीक सैरावैरा झाले. काहींनी नजिकच्या तुरीच्या शेतात आडोसा घेतला. त्यामुळे ते बचावले. त्यामुळे काही वेळानंतर पुन्हा अंत्यविधी पुर्ण करण्यात आला. मात्र तोपर्यंत या हल्ल्यात 35 ते 40 जण जखमी झाले होते. काहींनी गावातीलच डॉक्टरकडे धाव घेतली, तर काही जण तातडीने वलगाव, अमरावती येथील खासगी रूग्णालयात दाखल झाले.त्यांच्यावर उपचार सुरू आहे. या हल्ल्यात मुरलीधर वानखडे (कवठा), सचिन गणोरकर (अकोट), टाकरखेडा संभु येथील सुरेंद्र देशमुख, देवानंद टवलारे, सुधीर टवलारे, राजू निमकर, अनिकेत वानखडे, सुरज कांडलकर, गोपाल देशमुख, बाबू येवतकर, प्रवीण पाटील, वृषभ टवलारे यांच्यासह 35 ते 40 जणांचा समावेश आहे.

# बाभूळवनातून जप्त केले ते शिर

## भूगाव येथील हत्या प्रकरण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 30 )** – खोलापुरी गेट ठाण्याच्या हद्दीतील अकोली स्मशानभूमीलगत गुरुवारी दुपारी आढळलेल्या विना शिर मृतदेहाची ओळख पटविण्यात शहर पोलिसांना यश आले. मृताच्या खिशात आढळलेली तंबाखूची पुडी %मेड इन परतवाडा% असल्याने पोलिसांनी तपासचक्रे हलविली आणि अवघ्या 24 तासांत शिर नसलेल्या त्या मृतदेहाची, खुनाची घटनेची यशस्वी उकल केली. दुर्योधन बाजीराव कडू (63, रा. भूगाव, ता. अचलपूर) असे मृताचे तर, निकेतन रामेश्वर कडू (29, रा. भूगाव) असे अटक आरोपीचे नाव आहे. आरोपीने मृतकाचे शिर पुर्णा नदीच्या पात्रात फेकल्याची कबुली दिली होती, त्यानंतर पोलीस खाक्या दाखविल्यावर आरोपीने बाभूळवनात शिर फेकल्याची कबुली दिली. पोलिसांनी आता हे शिर ताब्यात घेतले आहे.

दुर्योधन कडू यांचे शिर येथील अकोली रोड भागात सत्तुराने धडावेगळे करून ते आसेगाव पूर्णालगतच्या पूर्णा नदीच्या पात्रात फेकल्याची कबुली आरोपीने दिली. त्यानुसार, गुन्हे शाखा युनिट -1 व स्पेशल स्कॉडचे अधिकारी आरोपीला घेऊन शुक्रवारी रात्री आसेगावात पोहोचले. रात्री ८=३० च्या सुमारास पोलिसांनी टाकरखेडा पूर्णास्थित पूर्णा नदीपात्राच्या पुलाच्या काठावरील बंगाली बाभुळबनातून मृताचे धडावेगळे केलेले शिरदेखील ताब्यात घेतले. तत्पूर्वी गुन्हे शाखेने संशयित आरोपी म्हणून निकेतन याला सरमसपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून शुक्रवारी सायंकाळी ताब्यात घेतले होते. त्याने चौकशीदरम्यान दुर्योधन यांचे शिर अमरावतीहून आसेगावला नेले व ते पूर्णा नदीपात्रात टाकल्याची कबुली दिली. त्यानंतर मृत दुर्योधन कडू यांचे शिर शोधून काढण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले होते. त्याचा उलगडा करण्यात पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव व आसाराम चोरमले यांच्या नेतृत्वातील पोलिस पथक अवघ्या काही तासात यशस्वी झाले.

# माऊलीच्या दर्शनाकरिता पायदळ वारी आज होणार रवाना

## ● श्री समर्थ गजानन महाराज संस्थानाचे आयोजन ●



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )** – येथील समर्थ कॉलनी स्थित श्री समर्थ गजानन महाराज संस्थानाकडून यंदाही पायदळ वारीचे आयोजन करण्यात आले आहे. सलग तिसऱ्या वर्षी हे आयोजन करण्यात आले आहे. उद्या 1 डिसेंबर रोजी टाळ, मृदुंगाच्या गजरात ही पायदळ वारी शेगावकडे रवाना होणार आहे. श्री समर्थ गजानन महाराज संस्थानाकडून दरवर्षी 1 डिसेंबरला या अमरावती ते शेगाव पायदळ वारीचे आयोजन करण्यात येते. गेल्या दोन वर्षांपासून या वारीत 200 महिला व पुरुष भक्त सहभागी होतात. तसेच चिमुकल्यांसह ज्येष्ठही या वारिमध्ये सहभागी होतात. 1 डिसेंबरला सकाळी 7 वाजता समर्थ कॉलनी येथून समर्थ गजानन महाराज संस्थानातून वारिचे प्रस्थान होईल.

### अनेक ठिकाणी होणार पालखीचे पूजन

माऊलीच्या पालखीचे ठिकठिकाणी पूजन होणार आहे. ज्यामध्ये वलगाव, खारतळेगाव, धामोरी येथे पालखीचे पूजन होईल. त्यानंतर दर्यापूर, सांगळूद, सावरा फाटा, वडनेर गंगाई, मुंडगाव, दापोरी येथे पालखीचे पूजन व वारकऱ्यांची चहा, नाश्ता, जेवणाची व्यवस्था करण्यात येईल. 6 डिसेंबर अडसूळ येथून सकाळी साडेचार वाजता पालखीचे प्रस्थान होवून गजानन महाराज संस्थान शेगाव येथे पालखी पोहचून माऊलीचे दर्शन घेतले जाईल. त्यानंतर ही पालखी ट्रॅवल्स ने वारकरी परत येतील.



# अजगराने गिळले रोही चे पिल्लू

### सर्पमित्रांकडून अजगराचे रेस्क्यू

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.30 )–** तालुक्यातील नेरपिंगळाई येथील मंगेश चौधरी यांचे शेतात जवळपास 10 फुटाच्या अजगराने रोही चे पिल्लू गिळले. मोर्शी येथील सर्पमित्र प्रियांशु तायवाडे यांनी आपल्या टीमसह येऊन अजगरास पकडून वनविभागाचे ताब्यात दिले.


नेरपिंगळाई येथील शेतकरी मंगेश चौधरी यांना त्यांच्या शेतातील झोपडीमध्ये रोही च्या पिल्लाची शिकार करून लपून बसलेला अजगर दिसला. शेतकरी चौधरी यांनी मोर्शीच्या सर्पमित्रांना याची माहिती दिली. सर्पमित्र प्रियांशु तायवाडे, रोहित अमझरे, विवेक सावरकर, राज कुरवाडे, सुरज धुर्वे,तानाजी युवा बहुउद्देशीय संस्था यांचे अध्यक्ष राहुल पंडागरे यांनी त्वरित हजेरी लावून अजगराला सुरक्षित पकडून शिरखेड वन विभागाचे अधिकारी एफ.जी खेरकर यांच्या ताब्यात दिले.

# नवरी मिळे ना नवऱ्याला!

## उपवर मुलास कारभारीण मिळणं झालं कठीण

**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट,( दि.30 )** – कार्तिक पौर्णिमेला तुळशी विवाह आटोपताच विवाह सोहळ्यांना सुरवात होते. उपवर मुला-मुलींसह स्थळ शोधण्याच्या कार्यक्रमाला वेग आला आहे. मात्र शेतकरी मुलांची मात्र चांगलीच फरफट होत असून त्यांना मुलगी मिळणे अत्यंत कठीण झाले आहे. सध्या नोकरी करणाऱ्यांसह व्यावसायिकांना मुलींच्या कुटुंबीयांकडून प्राधान्य दिले जात असून, %शेतकरी नवरा नको गं बाई' असे मुलीही म्हणताना दिसत आहे. परिणामी अनेक शेतकरी तरुणांची अवस्था ओसाड माळरानासारखी झाली आहे.



अलीकडे जोडीदार निवडताना मुलींना नोकरीसह मुलाकडे शेतीही हवी असते. मात्र, शेतकरी नवरा त्यांना नको आहे. त्यामुळे ग्रामीण भागात सामाजिक समस्या जटिल झाली आहे. शिकलेल्या मुली व त्यांचे पालक आपल्या मुलीसाठी शिकलेला व सरकारी नोकरी व घरी थोडीफार शेती असलेल्या मुलांनाच पसंती देत आहेत. खासगी नोकरी आणि सध्या कमी पगार असला असला तरी चालेल; पण तो शहरात राहणारा असावा, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे. जुन्या काळामध्ये उत्तम शेती, मध्यम व्यापार तर कनिष्ठ नोकरी समजली जायची. आता मात्र उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि शेतीला कनिष्ठ दर्जा दिला जात आहे. पूर्वी ग्रामीण भागातील तरुणाचे लग्न जुळण्याचे काम परिचीत किंवा नातलगातील व्यक्की ही नातेवाईकांकडे, 'एखादी मुलगी पाहा हो,' असा सूर आळवत त्यातुनच लग्न जुळायचे.

### मुलींच्या अपेक्षा वाढल्या

सध्या ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुलींच्याही अपेक्षा वाढल्या आहेत. उच्चशिक्षित, नोकरी, निर्व्यसनी, घरंदाज, कमविता मिळावा, अशी त्यांची इच्छा असते. त्यामुळे शेतकरी शेतमजूर वरांची कुचंबणा होताना दिसून येत आहे.

### अल्पभुधारक शेतकरी तरुणांचे हाल

समाजातील मुलींचे प्रमाण कमालीचे कमी झाले आहे. परिणामी ग्रामीण भागातील तरुणांना वधू मिळणे कठीण झाले आहे. प्रत्येक गावात एक ते पाच एकरपर्यंत शेती असलेल्या तरुणांना तर मुलगी मिळणे कठीण झाले असून यातील अनेक तरुणांच्या वयामध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे एजंटांकरवी अन्य जातीतील मुलींच्या पालकांना पैसे देऊन विवाह करणे सुरू झाले आहे. हुंडा देणे-घेणे कायद्याने गुन्हा आहे, तरीही समाजात आतापर्यंत विविध नावाखाली हुंडा घेतला जात असल्याची वस्तुस्थिती आहे. मुलींच्या कुटुंबाकडून यापूर्वी भरमसाठ हुंडा घेतला जात होता. त्यामुळे अनेक पालकांचे दिवाळे निघायचे. मात्र सध्या मुली कमी झाल्याने दोन्ही बाजूंचा लग्नाचा खर्च करून मुलींच्या वडिलांना दोन ते तीन लाख रुपये देण्यासही अनेक पालक तयार आहेत. विशेषत: ग्रामीण भागात अशापद्धतीने अनेक विवाह पारही पडताहेत. फसवणुकीच्या प्रकारात वाढ लग्नासाठी मुलगी मिळत नसल्याने ग्रामीण भागात अनेक तरुणांची फसवणूक होण्याचे प्रमाणही वाढले आहे. फसवणूक करणाऱ्या अनेक टोळ्या सक्रिय झाल्या असून पैसे, दागिने घेऊन लग्नाच्या दुसऱ्या दिवशीच वधू पसार होण्याचे प्रमाण वाढले आहे.

# 18 वीज चोरट्यांवर कारवाई

## ■ 5.15 लाख रुपयांची वीज चोरी उघड

## ■ अचलपूर महावितरणची धडक कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.30 )–** महावितरण उपविभाग सिटी-1 अंतर्गत असलेल्या असेगाव, हरम आणि परसापूर वितरण केंद्राच्या विविध गावांमध्ये वीज चोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली. या मोहिमेत 18 पेक्षा जास्त वीजचोरांवर कारवाई करून त्यांच्याकडून 5,15,314 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

या कारवाईमुळे परिसरातील वीजचोरट्यांमध्ये धडकी भरली आहे. उपकार्यकारी अभियंता मनोज टवळकर यांनी सांगितले की, अशा प्रकारची कठोर



कारवाई पुढेही सुरू राहील, आणि वीजचोरांना कुठल्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. ही कारवाई विभागीय कार्यकारी अभियंता देवेंद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपकार्यकारी अभियंता मनोज टवळकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. असेगाव वितरण केंद्राचे सहायक अभियंता गौरव निस्ताणे, परसापूर वितरण केंद्राचे सहायक अभियंता निलेश रोटे, आणि हरम वितरण केंद्राचे कनिष्ठ अभियंता राजेश मिसुरकर यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह ही कारवाई यशस्वीपणे केली.

### वीज चोरी करू नका, अधिकृत कनेक्शन घ्या!

कुणीही वीज चोरी करू नका आणि अधिकृत वीज कनेक्शन घ्या. वीजेचा वापर योग्य पद्धतीने करा आणि गरज नसताना वीजेचा अपव्यय टाळा. तसेच, चालू व बकाया वीजबिलांचा वेळेवर भरणा करून महावितरणला सहकार्य करावे.

**मनोज टवलारकर,**
**उपकार्यकारी अभियंता**
**अचलपुर**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अचलपूरला मिळेल का जिल्ह्याचा मान?

■पुन्हा कधी फिरतील फिनले मीलची चाके ?

■नवनिर्वाचित आमदार प्रवीण तायडेंसमोर अनेक आव्हाने





**मो.अजहरुद्दीन**

**अचलपूर( दि.30 )** - अचलपूर मतदारसंघाने माजीमंत्री तथा प्रस्तापित आमदार बच्चु कडू यांना मागे सारत भारतीय जनता पक्षाचे प्रवीण तायडे यांना विजयी केले. राज्यात भारतीय जनता पक्षाचे पूर्ण बहुमत असल्यामुळे अचलपूरच्या विकासाचे स्वप्न साकार करण्याची मोठी संधी प्रवीण तायडे यांना मिळाली आहे. मात्र, अचलपूरच्या नागरिकांची अनेक वर्षांची मागणी असलेली 'अचलपूर जिल्हा निर्मिती' आणि कोरोना काळापासून बंद असलेली फिनले मिल पुन:चालू करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे.



अचलपूर जिल्हा निर्मितीची मागणी मागील 20 वर्षांपासून सातत्याने केली जात आहे. जिल्हा घोषित झाल्यास येथील प्रशासन कार्यक्षमता वाढेल, तसेच आर्थिक विकासाला चालना मिळेल. रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होईल आणि परिसरात संपन्नता येईल. स्थानिकांनी ही मागणी पुन्हा नव्या सरकारसमोर जोरकसपणे मांडली आहे.

### नव्या सरकारकडून अपेक्षा

अचलपूर मतदारसंघातील जनतेने प्रवीण तायडे यांना मोठ्या अपेक्षांनी निवडून दिले आहे. केंद्र आणि राज्य, दोन्ही ठिकाणी भारतीय जनता पक्षाचे सरकार असल्यामुळे विकासकामे वेगाने करण्यासाठी त्यांना राजकीय पाठबळ मिळू शकते. स्थानिकांचा विश्वास आहे की, आमदार प्रवीण तायडे आता अचलपूर जिल्हा निर्मिती आणि फिनले मिल पुन्हा सुरु करण्यासाठी ठोस पावले उचलतील अशी आशा आहे.

### फिनले मील पांढरा हत्ती

अचलपूरची प्रसिद्ध फिनले मिल कोरोना काळापासून बंद आहे. या मिलमुळे शेकडो कामगारांना रोजगार मिळायचा, परंतु मील बंद पडल्याने अनेक कामगारांना कमी वेतनावर दिवस काढावे लागत आहेत. या मिलमुळे स्थानिक कापूस उत्पादकांना चांगला भाव मिळायचा, परंतु आता ती शक्यता संपुष्टात आली आहे. त्यामूळे फिनले मिल पांढरा हत्ती ठरत आहे. मील बंद असल्यामुळे अचलपूरच्या आर्थिक विकासावर मोठा परिणाम झाला आहे. स्थानिकांना भीती आहे की, ही मिल कायमची बंद होऊ नये. ही मिल पुन्हा सुरू झाल्यास उत्पादन वाढेल आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील.

# सावंगा विठोबा नगरीत आज चंदन-उटी कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे,( दि.30 )** - तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे दि.1 डिसेंबर 2024 (रविवार) रोजी दुपारी 4 वाजता संस्थानच्या वतीने अमावास्या निमित्त चंदन-उटी कार्यक्रम संस्थानमध्ये आयोजित करण्यात आला आहे.

संस्थान तर्फे चंदनउटी नंतर बाहेर गावावरून येणारे भाविक-भक्त मंडळी करिता महाप्रसादाचे आयोजन संस्थानचे अन्नदान समितीच्या नियोजनात करण्यात आले आहे. तरी सर्व भाविक-भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष



कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामण रामटेके, गोविंद राठोड, दिगांबर राठोड, अनिल बेलसरे, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# पिण्याच्या पाण्यात मिसळताहे शेकडो लीटर घाण पाणी

### नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.30 )**- तालुक्यातील शेंदुरजनाघाट येथील वार्ड क्रमांक 8 भवानी पुरा या परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यातुन सांडपाण्याचा प्रवाह होत असल्याने परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात सापडले आहे. नागरिकांनी न.प.प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

प्राप्त माहितीनुसार, या परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारी पाइपलाइन काही



दिवसांपूर्वी काही कामानिमित्त खोदकाम करून उघडी करण्यात आली होती. ज्या भागात उघडी करण्यात आली होती तेथे मेन लाईनवरील जॉईंटवर मोठ्या प्रमाणात लिकेज आहे. दररोज या लिकेजमधून हजारो लिटर घाण पाणी पिण्याच्या पाण्यात मिसळत आहे. पिण्याच्या पाण्यात घाण पाणी मिसळत असल्याने येथील नागरिकांच्या आरोग्यावर या दुषित पाण्याचे दुष्परिणाम होत आहे. तसेच खोदकाम करून ठेवलेल्या भागातुन रहदारी करणेसुद्धा अडचणीचे ठरत आहे. या प्रकरणी परिसरातील नागरिकांनी न.प.प्रशासकीय कर्मचाऱ्यांकडे तोंडी तक्रारी करूनसुद्धा याकडे कोणी आजपर्यंत गांभीर्याने लक्ष दिले नसल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला आहे. त्यामुळे या लिकेजची तत्काळ दुरूस्ती करून खोदुन ठेवलेली नाली बुजविण्यात येईल की पुन्हा असाच त्रास परिसरातील नागरिकांना सहन करावा लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# निसर्गा फाउंडेशन मार्फत संविधान जनजागृती अभियान

**75 व्या संविधान दिवसानिमित्त आयोजन**

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.30 )**- मेळघाटातील निसर्गा फाउंडेशन या संस्थेची मुंबई येथील कोरो इंडिया संस्थेकडून ग्रासरूट लिडरशिप अँड ऑर्गनायझेशन डेव्हलपमेंट या कार्यक्रमासाठी निवड झाली. या कार्यक्रमा अंतर्गत संविधान मूल्यावर आधारित अत्यंत सुंदर सहज समजेल अश्या भाषेत 14 पानांचे पोस्टर तयार करण्यात आले आहे. त्यावरून देशाचे संविधान काय म्हणते? आपले मूल्य काय आहेत? कोणते हक्क आपल्याला मिळाले आहेत? आपले कर्तव्य काय आहेत, एक भारतीय नागरिक म्हणून? असे संविधानातील हे सर्व





विषय कोरो इंडिया निर्मित संविधान पोस्टर वर आहेत. 75 वा संविधान दिवस या निमित्ताने मेळघाटात संविधान जनजागृती अभियान मेळघाट अशा अभियानाला घुटी या गावापासून निसर्गा फाउंडेशनने सुरवात केली आहे. गावातील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापक तसेच इतर सर्व शिक्षक मंडळी यांच्या मदतीने संविधान रॅली मुल्याच्या सहभागाने काढण्यात आली. गावातील पालक या उपक्रमात सहभागी झाले होते. सकाळी 11 ते 1 वाजे पर्यंत हा कार्यक्रम पार पडला. संविधानाच्या राईट टू एज्युकेशन मूल्यांविषयी सर्व मुलांना माहिती देण्यात आली. निसर्गा फाउंडेशन कोरो फेलो सुरेश सावलकर यांनी शाळा परिसर, मंदिर परिसरात संविधानाची उद्देशिका विद्यार्थ्यांच्या मदतीने लावली. घुटी या गट ग्रामपंचायत गावात प्रमुख ग्रामसभा ह्या योग्यरित्या झालेल्या नाहीत. येत्या 26 जानेवारी ची ग्रामसभा योग्य कोरम सहित करणे तसेच बंधनकारक असलेली महिला ग्रामसभा घडवून आणणे हे गावातील लोकांनी संविधान दिवसाच्या निमित्ताने ठरवले आहे. या करिता कोरो इंडिया च्या विदर्भ समन्वयक राणी येडसकर यांनी गावातील लोकांना मार्गदर्शन केले. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय धारणी येथे सुद्धा ही 14 पोस्टर्स ची संविधान प्रदर्शनी दुपारी 2-6 यावेळेत लावण्यात आली. तहसील, पंचायत समिती, उपविभागीय कार्यालयाचे कर्मचारी तसेच एसडीएम प्रियंवदा म्हाडदळकर, तसेच धारणी चे तहसीलदार प्रदीप शेवाळे यांनी प्रदर्शनी ला भेट दिली.

> संविधान जनजागृती अभियान आम्हाला पुढील 3 वर्षात मेळघाटातील 300 गावात न्यायचे आहे. कारण आजही संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्काचे उल्लंघन मेळघाटातील जनतेच्या वाट्याला येत आहे. त्यामुळे संविधान जागृत पिढी मेळघाटात घडवणे आवश्यक आहे.
>
> **सुरेश सावलकर, कोरो इंडिया फेलो, निसर्गा फाउंडेशन.**

### महात्मा ज्योतीबा फुले पुण्यतिथी साजरी

**हिवरखेड** - येथे महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी निमित्त महात्मा फुले हायस्कूल येथे हारार्पण व पूजन करण्यात आले. तसेच बुद्धविहार येथे तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी ऋतिक मालपे, शुभम तडस, अभिजित गहुकर, यश होले, साहेबराव पाटील, देवेंद्र गोरडे, गोपाल मालपे, डॉ.रवींद्र कुबडे, निलेश शिरभाते, सचिन तायवाडे, प्रमोद गणोरकर, गोपाल टाकळे, शर्मा भाऊसाहेब, माजी प्राचार्य रविंद्र वासनकर, शिक्षक विनोद वासनकर, गहूकर, धनंजय उमप, भोजने, वेदांत भेले, निलय भेले, दीप देवघरे, निलेश गडेकर व शाळेतील शिक्षक वृंद कर्मचारी हजर होते.

# अंबाडा प्रा.आ.केंद्र येथे भव्य कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर

■शिबिरात 21 कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.30 )** - कुटुंब कल्याण योजनेचा भाग म्हणून अंबाडा येथील प्राथमिक स्वास्थ्य केंद्रात नुकतेच भव्य कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर देण्यात आले. आतापर्यंत घेण्यात आलेल्या कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिरांचे तुलनेत या शिबिरात सर्वाधिक शस्त्रक्रिया केल्याची नोंद करण्यात आली.



जिल्ह्यातील शल्य चिकित्सक तसेच मोर्शीचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेश जयस्वाल यांनी या शिबिरात शस्त्रक्रिया केल्यात.

महिला 18 आणि पुरुष तीन असे एकूण 21 शस्त्रक्रिया एकाच दिवशी करण्यात आल्यात. अंबाडा प्राथमिक स्वास्थ्य केंद्रांचे इतिहासातील एकाच दिवशी करण्यात आलेल्या या सर्वाधिक शस्त्रक्रिया आहेत. असे अंबाडा येथील प्राथमिक स्वास्थ्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी डॉ. तुषार बांबल, डॉ.नितीन गरकल यांनी सांगितले. याप्रसंगी निंभी येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.अनघा देशमुख आणि पिंपळखुटा (मोठा) येथील शुभांगी इंगळे प्रामुख्याने उपस्थित होत्या. याप्रसंगी आरोग्य सहाय्यक अजय आजनकर, मिना मदापुरे, महिला आरोग्य सेविका रेचल सदाशिव, आरोग्य सेविका मिनाक्षी नरोटे, आशा गटप्रवर्तिका मेघा झरबडे आणि शर्मा,परिचर मनोज गिरे , सुरेश वानखडे, राजेश नवले यावेळी प्रशिक्षणार्थी किरण श्रीखंडे आणि विना कुडवे इत्यादींनी उपस्थित राहुन कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# अमरावती शासकीय रुग्णालयात अन्नधान्य घोटाळा!

### आठ वर्षापूर्वीची तक्रार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 30 )** - शासकीय रुग्णालयात अन्नधान्य पुरवठ्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार आठ वर्षांपूर्वी झाली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी 22 नोव्हेंबरला अकोला मंडळात येणाऱ्या अमरावती, बुलढाणा, वाशिम, अकोला व यवतमाळ जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयांना आरोग्य सेवा आयुक्त कार्यालयाने अन्नधान्य पुरवठ्याचा तपशील, तसेच रुग्णालयांची नावे पत्ता तेथील संबंधित अधिकाऱ्यांची माहिती मागविण्यात आली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या रुग्णालयांमध्ये अन्नधान्य पुरवठ्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार 20 फेब्रुवारी 2016 रोजी तत्कालीन आमदार स्व. सरदार तारासिंह यांनी केली होती. यामध्ये पुरवठादारांनी कक्ष अधिकारी ते प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याशी संगनमत करून कोट्यवधीचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला होता. या तक्रारीनंतर संबंधित गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण होईपर्यंत पुरवठादारांची थकीत बिलेदेखील थांबविण्यात आली होती. या प्रकरणातील पुढील चौकशीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधात्मक विभाग मुंबई अप्पर पोलिस आयुक्त कार्यालयाच्या वतीने सार्वजनिक आरोग्य विभागाला 19 नोव्हेंबर 2024 रोजी माहिती मागविण्यात आली आहे. त्यामुळे आरोग्य सेवा आयुक्तालयाने अकोला मंडळातील पाचही जिल्ह्यांतील जिल्हा शल्य चिकित्सक यांना 22 नोव्हेंबरला अन्नधान्य गैरव्यवहाराच्या अनुषंगाने सर्व रुग्णालयांचा तपशील मागविला आहे.





> 2016 या वर्षामध्ये झालेल्या अन्नधान्य पुरवठ्यातील गैरव्यवहाराच्या अनुषंगाने रुग्णालयांचा तपशील मागविण्यात आला आहे. हा तपशील गोळा करणे सुरू आहे. यासंदर्भातील माहिती सर्व रुग्णालयांना मागविली आहे. हा तपशील प्राप्त होताच पाठविण्यात येईल.
>
> **डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा शल्यचिकित्सक**

### गीताई महिला बचत गटाकडून झाला होता पुरवठा

अकोला मंडळांतर्गत अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा व यवतमाळ या पाचही जिल्ह्यांतील शासकीय रुग्णालयांना चांदूर बाजार येथील गीताई महिला बचत गट औद्योगिक सहकारी संस्थेकडून अन्नधान्य, तसेच इतर वस्तू पुरवठा करण्यात आला आहे. या संस्थेकडून पुरवठा झालेल्या सर्वच रुग्णालयांचा तपशील मागविण्यात आला आहे.

# 20 डिसेंबर पासून बहिरम यात्रेला सुरुवात

**पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी केली पाहणी ● 19 डिसेंबर होणार मंदिरावर पूजा**



**विदर्भातील सगळ्यात जास्त काळ चालणारी यात्रा म्हणून प्रसिद्ध**

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,( दि.30 )** - मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवर भरत असलेल्या विदर्भातील सर्वात अधिक काळ चाललेले असलेल्या बहिरम या प्रसिद्ध यात्रा महोत्सवाला दि.20 डिसेंबर पासून सुरुवात होत असून त्याआधी 19 डिसेंबरला मंदिरामध्ये ट्रस्टचे पदाधिकारी यांच्या हस्ते होम हवन पूजा करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टीचे सदस्य किशोर ठाकरे यांनी दिली आहे.

बहिरम (भैरव) यात्रा ही दूरवर प्रसिद्ध असलेली यात्रा म्हणून ओळखली जाते. त्यामुळे या यात्रेच्या देखरेखीची जबाबदारी अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत चांदूरबाजार पंचायत समिती कार्यालय कडे असते. यात्रा सुरू होण्याआधी त्या ठिकाणी पंचायत समिती मधील विस्तार अधिकारी ईश्वर सातंगे यांनी जातीने लक्ष घालून त्या ठिकाणी साफसफाई करून घेतलेली आहे.

अशी माहिती यात्रा व्यवस्थापक निखिल नागे यांनी दिली. दि.9 ते 11 डिसेंबर पर्यंत या ठिकाणी जागेचा लिलाव प्रक्रिया पंचायत समिती चांदूर बाजार कडून राबविण्यात येणार आहे. सुरुवातीला या मंदिरात असलेली बहिरम बाबाची जी मूर्ती आहे ते पूजेच्या सुपारी इतकी होती. मात्र त्या ठिकाणी भाविकांनी सिंदूर आणि कच्चे तूप लावून ती मूर्त रूपात आपल्याला दिसून येते अशी ती जुनी आख्यायिका आहे. मात्र त्या मूर्तीवर अजूनही काही स्पष्ट सांगता येत नाही.

### कडाक्याची थंडी अन् गरम गरम जेवण

2024 मध्ये निवडणुकीचे वर्ष समजले जात असताना अनेक राजकीय घडामोडी किंवा अनेक राजकीय चर्चा या यात्रेदरम्यान होतील अशी शंका व्यक्त होत आहे. कडाक्याची थंड आणि त्यात राहुटी आणि संत्र्याची इंधन ची शेकोटी त्याचबरोबर गरम गरम जेवण आणि त्यावर राजकीय गप्पा यामुळे बहीराम यात्रा चांगलीच यावर्षी नावलौकिक होणार आहे.

### तमाशा बंद करुन रिंगण सोहळ्याला सुरवात

बहिरम बाबा ( भैरव ) म्हणून या मंदिराला ओळखले जात असले तरी या ठिकाणी येणारे भाविक भैरव बाबाच म्हणतात. बहीरम बाबा हे नवसाला पावणारे असल्याने अनेकांची त्या ठिकाणी श्रद्धा आहे. मध्य प्रदेशच्या सीमेवर असल्याने त्या ठिकाणी मध्य प्रदेश मधील भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते. बहिरम बाबाला आपले नवस पूर्ण किंवा फेडण्यासाठी त्या ठिकाणी आधी नरबळी किंवा बकरीची बळी दिली जात होती. मात्र परंपरेनुसार किंवा कालावधीनुसार ती परंपरा आता मोडीत चालली आहे. बहिरम यात्रा एकीकडे तमाशासाठी प्रसिद्ध असलेली होती. आमदार बच्चू कडू यांनी या भागातील शेतकऱ्यांचा किंवा शेतकरी मजुरांचा विचार करत तमाशा त्या ठिकाणी बंद केला. आणि ती यात्रा पारंपारिक पद्धतीने सुरू कशी राहिली याकडे त्यांनी आपले लक्ष दिले. यात्रेमध्ये भागवत सप्ताह, रिंगण सोहळा, शंकरपट इत्यादी नवनवीन कार्यक्रम होत असतात.

### शेताचे मोजमाप करताना वाद

**अमरावती**- खल्लार पोलीस ठाणे हद्दीत कसबेगव्हाण येथील रहिवासी मोईन मोहम्मद इक्बाल मोहम्मद यांच्या शेताचे मोजमाप भूमी अभिलेख कार्यालयाकडून सुरू होते. यावेळी सुभाष शिंगणे, अनिकेत गोमासे, शरण्य शिंगणे, पियुष शिंगणे, गजानन शिंगणे, प्रदीप शिंगणे यांनी वाद करून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. मोईन मोहम्मद इक्बाल यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.तसेच याप्रकरणी सुभाष शिंगणे यांच्या फिर्यादीवरून मोईन मोहम्मद इक्बालसह अन्य पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जाहीर सूचना

सर्वत्र आम जनतेस सुचीत करण्यात येत आहे की, मी माझे मुलाचा म्हणजे चि. सार्थक उर्फ अर्थद संतोष आकोटकर याचा कायदेशिर हक्क व हिस्सा मिळणे करिता चि. सार्थक चे वडिल संतोष रामभाऊ आकोटकर यांचे वर व आजोबा रामभाऊ नध्धुजी आकोटकर व इतर यांचे वर विद्यमान दिवाणी न्यायालय, अमरावती, येते खालील मिळकती बाबत दावा दाखल केला असुन माझी आर्थीक परिस्थीती हलाकीची असल्यामुळे व चि. सार्थक यास उत्पन्नाचे काहीही साधन नसल्यामुळे सोबत मुद्रांक शुल्क माफी करीता सुद्धा अर्ज सादर केला असुन सदरचे प्रकरणाचा क्र. एस. जे. प्रकरण 2233/2021, असा असून सदरचे प्रकरण विद्यमान 3 रे, सह दिवाणी न्यायाधिश, (व. स्तर) अमरावती, यांचे न्यायालयात प्रलंबीत आहे.

सदरचे दाव्यात नमुद केलेला मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे - अ) मौजे शिरजगाव कसबा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथील गट क्र. 1175, भो. वर्ग 1, क्षेत्रफळ 0 हे. 14 तर, याची चतु:सिमा, ब) मौजे शिरजगाव कसचा, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती येथील गट क. 932, भो. वर्ग 1, क्षेत्रफळ 1 हे. 15. आर, याची चतु: सिमा- क) मौजे शिरजगाव कसबा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथील गट क्र. 929, भो. वर्ग 1, क्षेत्रफळ 1 हे. 00 आर. ड) मौजे शिरजगाव कसबा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथील गट क्र. 931, मो. वर्ग 1, क्षेत्रफळ 0 हे. 56 आर, याची चतु: सिमा, इ) मौजे शिरजगाय कसचा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथील गट क्र. 2596/1, क्षेत्रफळ 111.41 चौ. मी., ई) मौजे शिरजगाव कसबा, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती येथील गष्ट ग्रा. 2596/2, क्षेत्रफळ 111.41 चौ. मी., उ) मौजे शिरजगाय कसबा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथील गट क्र. 2516/3, क्षेत्रफळ 189.43 ची. मी., ऊ) मौजे शिरजगाव कसथा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथील गट क. 2596/6, क्षेत्रफळ 136.46 चौ. मी., ए) मौजे शिरजगाव कसबा, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती येथील गट क्र. 2596/7, क्षेत्रपाळ 136.46 चौ. मी., ऐ) मौजे नवसारी, प्रगणे नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती येथील सर्वे क्र. 32/1 मधिल प्लॉट क्र. 16-अ, क्षेत्रफळ 1.35 व त्यावरील बांधलेले घर, याची चतु:सिमा, ओ) मौजे शिरजगाव कसबा, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती येथील ग्रामपंचायत हद्दीतील प्लॉट व त्यावरील वडीलोपार्जीत घर क्र. 444, याची चतु:सिमा.

वरिल मिळकती बाधतचा वाद हा न्यायप्रविष्ठ असल्यामुळे सदरच्या वरिल वर्णनाच्या मालमत्तेबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार कोणासोबतही करु नये, केल्यास तो आमचेचवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २३/०४/२०२२

स्थळ :- अमरावती

**सार्थक उर्फ अर्थव संतोष आकोटकर**
**तर्फे अज्ञान पालन कर्ती**
**प्रज्ञा वसंतराव कतारे**